N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): बीड  **P.S.**(ठाणे): आष्टी  **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0006  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/01/2022 00:39 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरुवार  **Date From** (दिनांक पासून): 23/12/2021

**Date To** ( दिनांक पर्यंत): 23/12/2021

**Time Period** (कालावधी): पहर 5  **Time From** (वेळेपासून): 13:06 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:37 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/01/2022  **Time** (वेळ): 00:07 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 002  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/01/2022 00:07 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1. (a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): आष्टी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भारत ज्ञानोबा राऊत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1965  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | प्रतिबंधक विभाग, बीड ,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत ,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | प्रतिबंधक विभाग, बीड ,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत ,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सय्यद ग्रामसेवक ग्राम पंचायत | | | 1. ग्राम पंचायत कार्यालय, वेलतुर,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 06/01/2022.कम्प आष्टी जि.बीड.मी भारत ज्ञानोबा राऊत, वय 55 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड मो.नं. 9158999091.सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 23/12/2021 रोजी अ◌ेसीबी कार्यालय, बीड येथे हजर असतांना तक्रारदार सुनिल पोपट आबदार, रा.मुर्शदपुर ता.आष्टी जि.बीड यांनी फोन करुन, एक लोकसेवक लाच मागत असले बाबत तक्रार असल्याचे सांगुन, दिनांक 23/12/2021 रोजी आष्टी येथे येवुन तक्रार घेणे बाबत विनंती केली. त्यानुसार आम्ही तात्काळ विभागिय वन अधिकारी, बीड यांना पत्र देवुन पंच कर्मचारी 1) लक्ष्मण मारोती गाडे, वय -32 वर्ष व्यवसाय नोकरी वनरक्षक फिरते पथक, बीड मुळ बोरगांव चकला ता.शिरुर कासार ह..मु.रा.शिंदे नगर बीड, ता.जि.बीड 2) शेख अक्बर शेख रसुल, वय 52 वर्षे व्यवसाय नोकरी वनरक्षक फिरते पथक ,बीड रा. पोलीस पेट्रोलपंप समोर बालेपिर बीड ता.जि.बीड यांची सेवा उपलब्ध करुन घेतली. त्यांनतर लागलीच आम्ही, दोन पंच, पोह/सांगळे, पोना/गोरे, पोना/गिराम, चालक मेहत्रे यांचे सह 10.20 वा.बीड येथुन शासकीय वाहन क्र. MH 23 F 5000 ने सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक त्या सर्व साहित्यासह रवाना होवुन 12.10 वा.आष्टी येथे सुरक्षीत स्थळी पोहचलोत. सदर ठिकाणी तक्रारदार सुनिल पोपट आबदार हे हजर नव्हते. त्यांना आम्ही फोनवर संपर्क करुन सदर ठिकाणी बोलावुन घेतले. तक्रारदार आबदार हे सुरक्षित ठिकाणी हजर आल्यानंतर, त्यांचा परिचय करुन घेवुन, पंच व सापळा पथकाचा परिचय करुन दिला. तक्रारदार आबदार यांनी सांगितलेली तक्रार लप्टवर टंकलिखीत केली, ती पुढील प्रमाणे, मला राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत मौजे वेलतुरी ता. आष्टी जि. बीड या गावातील ग्रामपंचायत इमारत दुरुस्ती करणाचे काम सन -2020 मध्ये भेटलेले असुन सदर ग्रामपंचायत ईमारतीचे दुरुस्तीचे काम मी पुर्ण केलेले आहे. सदरचे काम पुर्ण झाले नंतर मी काम पुर्ण झाले बाबतचे प्रमाणपत्रासह दि.13/12/2021 रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती, आष्टी यांना वेलतुरी ग्रामपचांयत दुरुस्तीचे बिल मिळणे बाबत अर्ज दिला. सदर कामाचे बीलाचे संदर्भात मी ग्राम पंचयात वेलतुरी ता. आष्टी जि.बीड येथील ग्रामसेवक सय्यद यांना भेटुन बिलाची मागणी केली असता ग्रामसेवक सय्यद हे मला म्हणाले की, तुम्हाला ग्रामपंचायत ईमारत दुरुस्तीचे काम पुर्ण केल्याचे बिलाचा नेट पेमेंटच्या चेक व्यतीरिक्त झालेल्या कामाच्या बीलावरील जी.एस.टी. चा चेक ग्राम पंचायतच्या खात्यावर जमा न करता तुम्हाला देण्यासाठी जी.एस.टी.च्या चेकच्या रक्कमेच्या 50% रक्कम द्यावी लागेल, जो पर्यंत तुम्ही मला पैसे देणार नाही तो पर्यंत मी जी.एस.टी.चा चेक देणार नाही. त्यावेळी मी त्यांना विचारले की, सदर रक्कम बाबत मला पावती देणार आहे का ? त्यावर त्यांनी सांगीतले की सदर रक्कम दिल्या शिवाय मी चेक देणार नाही त्यावर मला कळुन चुकले की, ग्रामसेवक सय्यद मागणी करत असलेले पैसे हे लाचेचे आहे. मी केलेल्या कामाची जी.एस.टी. 42742/- रु. आलेली आहे. मला ग्रामसेवक सय्यद यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी आपनाकडे तक्रार करत आहे. आज दि.23/12/2021 रोजी ग्रामसेवक सय्यद यांची भेट घेऊन माझे कामाविषयी चर्चा करणार असुन मला मागितलेल्या जी.एस.टी.च्या 50% रक्कमे मध्ये रक्कम कमी करणे बाबत विनंती करणार आहे. माझे कामासाठी ग्रामसेवक सय्यद हे जेवढ्या

रक्कमेची मागणी करतील तेवढी रक्कम मी उपलब्ध करील. वगैरे मजकुराची तक्रार दिली. सदर तक्रारीवर तक्रारदार आबदार, पंच व मी सही केली.तक्रारदार आबदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार आबदार व पंच क्र.1 गाडे यांना पंचायत समिती कार्यालय, आष्टी येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार तक्रारदार आबदार व पंचांना लाच मागणी पडताळणी कारवाई संदभाने आवश्यक त्या सुचना दिल्या. व्हाईस रेकार्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकार्डर चालु करुन देवुन पंच क्र. 1 श्री.गाडे व तक्रारदार आबदार यांना लाच मागणी पडताळणी कामी 13.06 वा.पंचायत समिती, आष्टी येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर तक्रारदार आबदार व पंच क्र. 1 श्री.गाडे हे 13.37 वा.सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यावेळी पंच क्र. 1 श्री.गाडे व तक्रारदार आबदार यांना स्वतंत्रपणे विचारपुस करता, त्यांनी त्या बाबत सांगितले की, आपले सुचनेवरुन आम्ही पंचायत समिती कार्यालय, आष्टी येथे गेलो, तेथे गेल्यानंतर लोकसेवक सय्यद हे कार्यालयात हजर नसल्याने तक्रारदार आबदार यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9421339726 वरुन लोकसेवक सय्यद यांचे मोबाईल क्र. 9403266354 वर स्पीकर चालु करुन फोन लावला असता, तक्रारदार आबदार व ग्रामसेवक सय्यद यांचेमध्ये तक्रारदार आबदार यांचे कामाचे बिला संदर्भात'चर्चा झाली. तक्रारदार आबदार यांनी लोकसेवक सय्यद यांचे कडे त्यांचे कामाचे चेकची मागणी केली असता, लोकसेवक सय्यद यांनी तक्रारदार यांचे कडे कामाची एम.बी. व इतर कागदपत्राची मागणी करुन, तक्रारदार आबदार यांनी केलेल्या कामाचे नेट पेमेन्टचा चेक देतो असे सांगुन, जी.एस.टी.चा चेक ग्राम पंचायतच्या खात्यावर जमा न करता तक्रारदार आबदार यांना देण्यासाठी जी.एस.टी.रक्कमेच्या निम्म्या रक्कमे ऐवजी 30,000/- रु. द्यावे लागतील, तेव्हाच जी.एस.टी. रक्कमेचा चेक देईल, असे फोनवर संभाषण झाले, असे इंग्रजीत सांगितली. त्यानंतर व्हाईस रेकार्डर मध्ये झालेले संभाषण ऐकुन त्यांची स्क्रीप्ट तयार केली. एकंदरीत लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार सुनिल आबदार व पंच क्र.1 गाडे यांना स्वतंत्रपणे विचारपुस करता व व्हाईस रेकार्डरमधील तक्रारदार सुनिल आबदार लोकसेवक सय्यद यांचेत मोबाईल फोन वर झालेले संभाषण पंचा समक्ष ऐकले असता, लोकसेवक सय्यद यांनी तक्रारदार सुनिल आबदार यांचेकडे त्यांनी ग्रामपंचायत वेलतुरी ता. आष्टी येथील ईमारत दुरुस्तीचे केलेल्या कामाचे बिलाचा नेट पेमेन्टचा चेक देवुन जी.एस.टी. चा 42742/- रु. रक्कमेचा चेक ग्राम पंचायतच्या खात्यावर जमा न करता तक्रारदार आबदार यांना देण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसा दिनांक 23/12/2021 रोजी सविस्तर लाचमागणी पंचनामा करण्यात आलेला आहे. ग्रामसेवक सय्यद हे गावी असल्याने दिनांक 24/12/2021 रोजी आष्टी येथे पंचायत समिती कार्यालयात मिटींग कामी येणार असल्याने ग्रामसेवक सय्यद यांचे विरुध्द दिनांक 24/12/2021 रोजी सकाळी 10.30 वा.सुरक्षित ठिकाणी हजर राहणे बाबत कळवुन कार्यवाही स्थगित करुन आम्ही सापळा पथकासह बीड ला परत आलो. दिनांक 24/12/2021 रोजी आम्ही पंच व सापळा पथकासह कार्यवाहीसाठी लागणारे सर्व साहित्यासह अ.ला.प्र.वि. कार्यालय, बीड येथुन 09.45 वा. दरम्यान शासकीय वाहन क्र.MH-23 F-5000 ने रवाना होवुन आष्टी येथे सुरक्षीत स्थळी 11.30 वा. पोहचलोत. तक्रारदार आबदार हे आल्यानंतर त्यांना व पंच क्र. 1 गाडे यांना लाच मागणी पडताळणी बाबत योग्य त्या सुचना देवुन तक्रारदार आबदार यांचे कडे व्हाईस रेकार्डर चालु करुन देवुन 13.42 वा. पंचायत समिती कार्यालय आष्टी येथे त्यांचे मोटार सायकलवर पाठवले. तक्रारदार आबदार व पंच क्र. 1 हे 15.02 वा. मिटींग सुरु असल्याने परत आले. त्यानंतर तक्रारदार आबदार यांचे कडे व्हाईस रेकार्डर चालु करुन देवुन 15.50 वा. परत पंचायत समिती कार्यालय आष्टी येथे त्यांचे मोटार सायकलवर पाठवले. तक्रारदार आबदार व पंच क्र. 1 हे 16.39 वा. परत आले व त्यांनी कळविले की, लोकसेवक सय्यद मिटींग संपताच निघुन गेले. त्यांची भेट झाली नाही व त्यांचा फोन लावला असता फोनही लागत नाही. त्यानंतर तक्रारदार सुनिल आबदार यांनी आम्हास विनंती केली की, जेव्हा लोकसेवक सय्यद यांचा फोन येईल किंवा भेटण्यास बोलवतील त्या वेळी पुन्हा कार्यवाही करण्यासाठी आष्टीला यावे, त्यास पंच व आम्ही संमती दर्शवली व झालेल्या कार्यवाही बाबत गोपनीयता बाळगण्या बाबत तक्रारदार आबदार, पंच व सापळा पथक यांना सुचना दिल्या. तसा दिनांक 24/12/2021 रोजी सविस्तर लाचमागणी पंचनामा करण्यात आलेला आहे. कार्यवाही स्थगित करुन पथकासह बीड ला परत आलो. त्यानंतर दिनांक 27/12/2021 रोजी तक्रारदार सुनिल पोपटराव आबदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे येवुन कळविले की, दिनांक 27/12/2021 रोजी मी पंचायत समिती, आष्टी येथे गेलो असता, ग्रामसेवक सय्यद यांनी मला तुमच्या कामाचे चेक घेवुन जा असे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही. तरी माझे ग्रामसेवक सय्यद यांचे कडील काम पुर्ण झालेले आहे. आता मला



मागणी केली नाही. तरी माझे ग्रामसेवक सय्यद यांचे कडील काम पुर्ण झालेले आहे. आता मला ग्रामसेवक हे माझ्याकडे माझे कामासाठी पैशाची मागणी करतील असे वाटत नाही" असे सांगितल्याने तसा त्यांचा सविस्तर जबाब नोंदविला आहे.

तरी एकंदर लाचमागणी पडताळणी दरम्यान दिनांक 23/12/2021 रोजी चे 13.06 ते 13.37 वा. चे दरम्यान पंचायत समिती कार्यालय, आष्टी येथे यातील आरोपी लोकसेवक सय्यद, ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, वेलतुरी ता.आष्टी जि.बीड यांनी तक्रारदार सुनिल आबदार यांनी केलेल्या वेलतुरी ग्राम पंचायत कार्यालयाचे इमारतीचे दुरुस्तीचे कामाचे नेट पेमेन्टचा चेक देवुन जी.एस.टी. चा 42742/-रु. रक्कमेचा चेक ग्राम पंचायतच्या खात्यावर जमा न करता तक्रारदार आबदार यांना देण्यासाठी जी.एस.टी.रक्कमेच्या निम्म्या रक्कमे ऐवजी 30,000/- रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे. अशा प्रकारे लोकसेवक सय्यद, ग्रामसेवक, वेलतुरी, ग्रा.पं.कार्यालय ता.आष्टी जि.बीड यांनी त्यांचे लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन त्यांना मिळणा-या पारिश्रमिका खेरीज प्रर्वतकदान, बक्षिस म्हणुन स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी तक्रारदार सुनिल आबदार यांचे कडे 30,000/- रु.लाचेची मागणी करुन लाच रक्कम 30,000/- रु. स्विकारण्याचे मान्य करुन सांपत्तीक फायदा मिळवण्याचा प्रयत्न केला. तक्रारदार सुनिल आबदार यांनी फिर्याद देण्यास असमर्थता दर्शवली आहे. म्हणुन माझी लोकसेवक सय्यद, ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, वेलतुरी ता.आष्टी जि.बीड यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

ही फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली, ती बरोबर व खरी आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Salim Amar Chaous(I (Inspector)) / DGPSACM7401 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Salim Amar Chaous
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSACM7401

पो.ठाणे अमलदार
पो.स्टे.आरी जि.बी.